# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १४५ वी (तातडीची) बैठकीचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि.१३ जुलै, २०२२ दुपारी ०५:०० वा.

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

व्यवस्थापन परिषदेची १४५ वी (तातडीची) बैठक बुधवार, दि.१३ जुलै, २०२२ रोजी दुपारी ०५:०० वाजता मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलमाणे:

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. वि. बा. पाटील - प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. महेश महादेव माने | सदस्य |
| ४) | डॉ. वि. पां. शिखरे | सदस्य |
| ५) | प्रा. डॉ. शं. कि. पाटील | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. वि. भा. घुटे | सदस्य |
| ७) | प्रा. डॉ. अ. बा. शिंगाडे | सदस्य |
| ८) | डॉ. ह. कृ. आवताडे | सदस्य |
| ९) | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी | सदस्य |
| १०) | श्री. अ. कि. आवळे | सदस्य |
| ११) | ॲड. श्रीमती नि. सु. मंकणी | सदस्या |
| १२) | कु. अ. चं. चव्हाण | सदस्या |
| १३) | डॉ. ता. ना. कोळेकर | सदस्य |
| १४) | डॉ. अ. उ. उबाळे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| १५) | डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण) पुणे,<br>मा. संचालक (तंत्र शिक्षण) | सदस्य |
| १६) | डॉ. शि. सु. गणपूर - संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित |
| १७) | सीए श्रे. हु. शहा - वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| १८) | प्रा. डॉ. सु. कि. पवार - प्र. कुलसचिव | सदस्य सचिव |

स्वागत:

मा. प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

अनुपस्थिती:

प्राचार्य डॉ. ब. पां. रोंगे, डॉ. एस. सी. मांडे, संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे व डॉ. ध. र. माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याकरिता "Summit of Leaders, Oxford" The Academic Union, Oxford, UK परिसंवादाकरिता मा. कुलगुरु यांना मिळालेल्या निमंत्रणाबाबत तसेच त्या अनुषंगाने आवश्यक आर्थिक खर्चास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: द अकॅडेमिक युनियन ऑफ ऑक्सफोर्ड यांचे दि.१३/०६/२०२२, दि.१७/०६/२०२२ रोजीचा ई-मेलद्वारे "Summit of Leaders, Oxford" The Academic Union, Oxford, UK दि.२१ जुलै, २०२२ रोजीच्या आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळा या कार्यक्रमाकरिता मा.कुलगुरु महोदया यांना निमंत्रित केलेले आहे. द कौन्सिल ऑफ अकॅडेमिक युनियन (AU, Oxford, UK) यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठासोबत परस्पर सहकार्यासाठी आदर आणि आशा व्यक्त केलेली आहे. कौन्सिल यांनी या कार्यक्रमाद्वारे ५४ देशांतील शैक्षणिक, शास्त्रज्ञ आणि व्यावसायिकांना एकत्र करत आहेत. ॲकॅडमिक युनियन विद्यापीठाचे उपक्रम, वैज्ञानिक संशोधन, नाविन्यपूर्ण शोध आणि उपलब्धी जगभरात लोकप्रिय करण्याचा आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक प्रकल्प आणि कार्यक्रमांमध्ये विद्यापीठाचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. शैक्षणिक युनियनच्या सहभागाने, ऑक्सफोर्ड आणि क्लब ऑफ रेक्टर्स ऑफ युरोपने अग्रगण्य प्रादेशिक शैक्षणिक संस्था, व्यावसायिक क्षमता, गुणवत्ता आणि व्यवस्थापनातील यशासाठी प्रतिष्ठित पुरस्कार स्थापित केले आहेत. The Academic Union, Oxford, UK दि.१७/०६/२०२२ रोजीचा ई-मेलद्वारे सबस्क्रिपशनचे तपशिल दिलेला आहे.

| अ.क्र | तपशिल | शुल्क |
|---|---|---|
| 1) | AU Membership Package (5 years Membership in Academic Union) | British Pounds Rs.1,800/- |
| 2) | Standart Package (Best University Certificate and memorable trophy) | British Pounds Rs.3,800/- |
| 3) | Premium Package | British Pounds Rs.4,800/- |

सबब, आंतरराष्ट्रीय पातळीवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याकरिता उक्तप्रमाणे AU Membership Package (५ years Membership in Academic Union) याकरिता सबस्क्रिपशन घेण्याची बाब तसेच त्या अनुषंगिक इतर खर्चास मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याकरिता "Summit of Leaders, Oxford" The Academic Union, Oxford, UK परिसंवादामध्ये मा.कुलगुरु यांना भाग घेण्यासाठी AU Membership Package (5 years Membership in Academic Union) यांचे Subscription घेण्यास व त्या अनुषंगाने येणाऱ्या आर्थिक खर्चास (अंदाजे रु.०४ लक्ष) सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

13/07/22
सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

13.07.22
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद